## नियमित दिवाणी दावा क्र. १२५/२०१५ मधील निशाणी क्र. ४४ वरिल आदेश

(धोंडिबा मिंडे वि. मारूती मिंडे)

प्रस्तुत अर्ज वादीने प्रतिवादी क्र. ५ भागुबाई चिमाजी मिंडे यांचे नाव दाव्यातुन रदद करण्यासाठी दाखल केला आहे. वादी कथन करतात की, प्रतिवादी क्र. ५ भागुबाई चिमाजी मिंडे यांचे दिनांक १३/१२/२०१७ रोजी निधन झाले आहे. प्रतिवादी क्र. ५ यांचे कायदेशीर वारस प्रतिवादी क्र. १ ते ४ म्हणुन सामील आहेत. प्रतिवादी क्र. ५ यांना प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचेशिवाय अन्य कोणीही वारस नाहीत. सबब प्रतिवादी क्र. ५ भागुबाई चिमाजी मिंडे यांचे नावापुढे मयत लिहुन त्यांचे नाव दाव्यातून रदद करण्याची विनंती केली. प्रस्तुत अर्जावर योग्य ते आदेश व्हावेत असे प्रतिवादी क्र. १ यांच्या विधीज्ञांनी म्हणणे दाखल केले.

**०२.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा सात वर्षे जुना आहे. दावा निरंतर ताकीदीकरीता व ठरावाकरीता दाखल केलेला आहे. अर्जासोबत निशाणी ४५ कडे प्रतिज्ञापत्र दाखल आहे. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे नाव दाव्यात समाविष्ट आहे. प्रतिवादी १ ते ४ यांचे व्यतिरिक्त अन्य वारस नाहीत असे वादीने कथन केले आहे. संपरिक्षा न्यायालयामध्ये योग्य तो पुरावा दाखल करणेची पुर्ण संधी देणे योग्य होणार आहे. हक्क अधिकारापासून मयताचे वारस वंचित राहु नये व त्यांना न्यायहक्क मागणेची संधी देणे हे कायदयास अभिप्रेत आहे. सबब प्रतिवादी क्र. ५ यांच्या नावापुढे मयत लिहुन नाव दाव्यातून रदद करणे योग्य होणार आहे. सबब न्यायाच्या दृष्टीने खालील आदेश पारीत करीत आहे.

### आदेश

१. निशाणी ४४ मंजुर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

३. प्रतिवादी क्र. ५ यांचे नावापुढे मयत असे लिहुन त्यांचे नाव रदद करण्याचा आदेश पारीत.

दिनांक: ०५.०९.२०२३

**(एम. ए. के. शेख)**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
घोडेगाव